# शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी

थिबा प्रासाद नजिक, रत्नागिरी – ४१५ ६१२. (महाराष्ट्र)
दूरध्वनी : ०२३५२-२२२२०३ / २२२४३५ फॅक्स : ०२३५२-२२२४३५
ई-मेल : principal_gpr@rediffmail.com वेबसाईट : www.gpratnagiri.org.in

जा.क्र.शातर/वि.वि/शिष्यवृत्ती /२०२३-२४/ दिनांक:- 30/09/2023

## विद्यार्थ्यांना सुचना

विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश शुल्क रु.१५५०/- ,रु.१७५०/-, रु.४५५०/- किंवा रु.४७५०/- इतके भरले आहे, अशा सर्व विदयार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर सोबत जोडलेल्या तपशिलाप्रमाणे शिष्यवृत्ती नविन अर्ज भरणे व नुतनीकरण करणे अनिवार्य आहे. अशा विदयार्थ्यांनी जर शिष्यवृत्तीचा अर्ज विहीत वेळेत भरला नाही, तर शिक्षण शुल्क संस्थेत भरावे लागेल, यांची नोद घण्यात यावी.तसेच विदयार्थ्याच्या होणा-या आर्थिक नुकसानीस विदयार्थी स्वतः जबाबदार राहील.

त्याच प्रमाणे ज्या विद्यार्थ्यांनी पुर्ण प्रवेश शुल्क भरले आहे व जे विदयार्थी अल्पसंख्याक आहेत, तसेच राजर्षी शाहु महाराज शिष्यवृत्ती व पंजाबराव देशमुख वसतिगृह योजनेस पात्र आहेत, अशा विदयार्थांनी सुध्दा विहित वेळेत महाडिबीटी पोर्टलवर अर्ज भरणे् आवश्यक आहे.महाडिबीटी पोर्टलवर तसेच एनएसपी पोर्टलवर या संस्थेमार्फत मिळणाऱ्या सर्व योजने अर्ज भरण्यास सुरु झाले आहे, याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी. विद्यार्थ्यांना असेही सुचित करण्यांत येते की, महाडिबीटी पोर्टल किंवा एनएसपी पोर्टल यापैकी एकाच कोणत्याही पोर्टलवर शिष्यवृत्ती संदर्भात लाभ घेण्यांत यावा. शिष्यवृत्ती अर्ज भरल्यानंतर पडताळणीअंती आक्षेप लागल्या विद्यार्थ्यांने सदर आक्षेपाची पुर्तता करणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी यथावकाश कार्यालयात (विद्यार्थी विभागमाध्ये) एक प्रत/हार्डकॉपी सर्व उपलोड केलेल्या कागदपत्रासह सादर करावी. तसेच काही अडचण असल्यास कार्यालयात शिष्यवृत्ती विभागाशी स्वतः संपर्क साधावा.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी

१) विभाग प्रमुख,संगणक यांनी संस्थेच्या (**website upload**) करावी.
२) सुचनाफलक.

Scanned with OKEN Scanner